जनसंपर्क कक्ष
5 JUN 2017 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
महाराष्ट्र टाईम्स

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया आजपासून

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

अभियांत्रिकी पदवी प्रथम वर्षाच्या २०१७ २०१८ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेला आज (ता. ५) पासून सुरुवात होत आहे. तंत्रशिक्षण संचलनालयाच्या सामायिक प्रवेशपूर्व परीक्षा विभागाने निश्चित केलेल्या नियोजनानुसार केंद्रीय पद्धतीने ही प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. एमएचटी सीइटी परीक्षेचा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला असून या परीक्षेतील स्कोअरवर अभियांत्रिकी प्रवेशाची गुणवत्ता यादी तयार होणार असल्याने प्रवेश घेण्याच्या प्रक्रियेला वेग येणार आहे.

बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट देणे आवश्यक आहे.

## जिल्ह्यातील सुविधा केंद्रे

- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग
- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, साळोखेनगर
- तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ
- धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटशन्स (बी मॅट), विकासवाडी
- डॉ. डी. वाय. पाटील इंजिनीअरिंग कॉलेज, तळसंदे
- तात्यासाहेब कोरे इंजिनीअरिंग कॉलेज, वारणानगर
- अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स
- डी.के. टी.ई. इचलकरंजी
- संजय घोडावत इन्स्टिट्यूट, अतिग्रे

## अशी आहे प्रक्रिया

बारावीमध्ये किमान ५० टक्के गुण असतील तर अभियांत्रिकीला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी पात्र ठरू शकतो. यामध्ये आर्किटेक्ट इंजिनीअरिंगच्या प्रवेशासाठीही ५० टक्के गुणासह नाटा परीक्षा देणे आवश्यक आहे. २७ मे रोजी बारावीचा निकाल लागणार आहे, तर ४ जून रोजी सीइटीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रकियेला गती येणार आहे. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये यूजर आयडी, पासवर्ड, ई मेल आयडी आणि संपर्क क्रमांक हे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अर्ज भरल्यानंतर सर्व कागदपत्रांची यादी कन्मर्फ केली पाहिजे. त्यासाठी एफसी सेंटरमधून ऑनलाइन पावती घ्यावी. शिष्यवृत्ती किंवा सवलतींच्या निकषाला पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी. त्यापुढचा टप्पा असतो तो गुणवत्ता यादीचा. यामध्ये तात्पुरती आणि अंतिम अशी यादी जाहीर करण्यात येते. तात्पुरत्या यादीमध्ये काही त्रुटी असतील तर तक्रार करण्याची सुविधा आहे. मात्र अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर तक्रार करता येत नाही.पर्याय म्हणून निवडलेल्या कॉलेजला पसंती असेल तर फ्रीज हा पर्याय निवडून प्रवेश निश्चित करावा. जर त्याच कॉलेजमधील अन्य शाखांचे पर्याय हवे असतील तर स्लाइड हा पर्याय निवडावा आणि जर मिळालेल्या अभ्यासक्रमाच्या वरील प्राधान्यक्रमातील अभ्यासक्रमांचा पर्याय हवा असेल तर फ्लोट हा पर्याय निवडणे आवश्यक आहे.

## अभियांत्रिकी प्रवेशाचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| अर्ज भरणे आणि छाननी प्रक्रिया | : ५ ते १७ जून |
| कच्च्या गुणवत्ता यादीची प्रसिद्धी | : १९ जून |
| पक्की गुणवत्ता यादीची प्रसिद्धी | : २२ जून |
| पहिली यादी प्रसिद्ध | : २८ जून |
| विकल्प भरण्याची दुसरी फेरी | : ५ ते ८ जुलै |
| पात्र विद्यार्थ्यांची दुसरी यादी | : १० जुलै |
| विकल्प बदलण्याची मुदत | : १६ ते १९ जुलै |
| पात्र विद्यार्थ्यांची तिसरी यादी | : २१ जुलै |

## प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे

- गुणपत्रिका
- लिव्हिंग सर्टिफिकेट
- डोमिसाइल व नॅशनॅलिटी सर्टिफिकेट
- सीइटी किंवा जेईई मेन पेपर १ चे स्कोअर कार्ड
- आधार कार्ड
- जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
- नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
- उत्पन्नाचा दाखला

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
5 JUN 2017

# आवड, कल लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची निवड करा

## जयदीप बागी : 'होलिस्टिक ॲप्रोच टुवर्डस एज्युकेशन' या विषयावरील व्याख्यानात मार्गदर्शन

कोल्हापूर : दहावी व बारावीनंतर कोणत्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा, हा अलीकडे कुटुंबातील गंभीर विषय बनला आहे. मुलांकडून पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. पाल्यांवर अपेक्षांचे ओझे न लादता त्यांची आवड, कल लक्षात घेऊनच अभ्यासक्रमाची शाखा निवडण्यास पालकांनी मदत करावी, असे मत शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी व्यक्त केले. लोकमत ॲस्पायर शैक्षणिक प्रदर्शनात 'होलिस्टिक ॲप्रोच टुवर्डस एज्युकेशन' या विषयावर रविवारी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. बागी म्हणाले, परदेशातील शिक्षण हे 'एज्युकेशन परचेस सिस्टीम' आहे. शिक्षणातील अभ्यासक्रम निवडण्याचे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आहे. भारतात मात्र आजच्या घडीलाही पालकांवर विसंबून राहावे



मार्गदर्शन करताना जयदीप बागी.

लागते. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात आंतरशाखीय दृष्टिकोन ठेवून शाखा निवडली पाहिजे.

स्वत:मधील पॅरामीटर तपासले पाहिजेत. यात बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता आणि हृदयाशी संबंधातून आलेला निर्णय अशा तीन पॅरामीटरचा वापर झाला पाहिजे. आज-काल लघुकाळ चालणारे निर्णय घेतले जातात.

दीर्घकाळ परिणाम करणाऱ्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जात नाही. १२ वी नंतर सीईटी परीक्षेनंतर अनेक पालकांची पळापळ सुरु होते. हीच पळापळ टाळायची असेल तर विद्यार्थ्यांची तयारी इयत्ता पाचवीपासूनच करवून घेतली जावी. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वंकष अशा अभ्यासक्रमाचा विचार केला पाहिजे. यावेळी तंत्रज्ञान विभागाचे डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'आंतर विद्याशाखेत करिअर करा'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'प्रत्येक विद्यार्थ्यांची शारीरिक आणि बौद्धिक क्षमता वेगळी असते. पालकांनी विद्यार्थ्यांवर करिअरसाठी दबाव टाकू नये. विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेऊनच अभ्यासक्रमाची निवड करावी. अभियांत्रिकी क्षेत्रात विद्यार्थ्यांना अमर्याद संधी उपलब्ध आहेत. स्पर्धेच्या युगात प्रत्येक विद्यार्थ्यांनी आंतरविद्याशाखेत करिअरचे स्वप्न ठेवावे,' असा सल्ला शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जय बागी यांनी विद्यार्थ्यांना दिला. शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान विभाग आणि दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्सच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी केशवराव भोसले नाट्यगृहात शुक्रवारी चर्चासत्र झाले. 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरची संधी आणि केंद्रीय प्रवेश प्रक्रिया' असा चर्चासत्राचा विषय होता.

डॉ. जय बागी म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागात गुणवत्तेवर प्रवेश दिला जातो. कोणत्याही प्रकारचे डोनेशन या ठिकाणी घेतले जात नाही. अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील सुमारे दीड लाख जागांसाठी केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया (कॅप) राबवली जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना सुरुवातीला ऑनलाइन नोंदणी करावी लागेल. ज्या विद्यार्थ्यांना विविध कारणांमुळे १७ जून या मुदतीत अर्ज करू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी कॅप फेऱ्या झाल्यानंतर संस्था स्तरावर स्वतंत्र फेऱ्या घेतल्या जातील.

कोल्हापूर शाखेचे पी. पी. प्रभू म्हणाले, 'ज्या विद्यार्थ्यांनी एमएचटी-सीईटी २०१७ या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे, त्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाच्या नोंदणीसाठी अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. जेईई (मुख्य) परीक्षेतून पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्क आकारले जाईल. प्रवेश प्रक्रियेची अधिक माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.'

समन्वयक एस. बी. चव्हाण यांनी इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशन, आर. जे. देशमुख यांनी कम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, डॉ. पी. डी. पाटील यांनी केमिकल इंजिनीअरिंग, एस. बी. काळे यांनी मेकॅनिकल इंजिनीअरिंग, महेश साळोखे यांनी सिव्हिल इंजिनीअरिंग, इराण्णा उडचंद यांनी फूड टेक्नॉलॉजी, पी. जे. पाटील यांनी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, अजय देशपांडे यांनी अॅग्री इंजिनीअरिंग, बलराम महाजन यांनी आर्किटेक्चर विषयावर मार्गदर्शन केले. अजय देशपांडे यांनी स्वागत केले.

5 JUN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांची फौज...



शिवाजी विद्यापीठ परिसरात स्वच्छता करताना विद्यार्थी.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात सकाळी सातला राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांची फौजच अवतरली. एकमेकांच्या हातात हात घालून त्यांनी स्वच्छतेस सुरवात केली.

मुख्य इमारतीसह रसायनशास्त्र, भाषाभवन, पदार्थविज्ञान, संख्याशास्त्र, ग्रंथालय, मानव्यशास्त्र परिसरातील प्लास्टिक कागद, बाटल्या, पालापाचोळा त्यांनी गोळा केला. पेठवडगावहून आलेल्या दादासाहेब घाटगे यांनी खास स्वच्छतेसाठी हजेरी लावली. त्याचबरोबर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनीसुद्धा परिसरातील कचरा गोळा केला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, एनडीआरएफचे निरीक्षक एस. डी. इंगळे, प्रा. जयंत पाटील, डॉ. बाबासाहेब वाघमारे, गोविंद नांदवडेकर, ए. के. जैना, अनिलकुमार चव्हाण, डी. जी. चिगळीकर, प्रा. सदाशिव मोरे, अभय जायभाय, प्रा. चांगदेव बंडगर, संग्राम मोरे, संदीप लोखंडे, किरण घुमे, अभिजित चिकणे, श्वेता पाटील, राजू लिंग्रस, नितीन कराळे यांनी वारसा जपण्याच्या उद्देशाने स्वच्छता मोहिमेत हिरीरीने सहभाग नोंदवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUN 2017
लोकमत



शिवाजी विद्यापीठातील कंझ्युमर्स स्टोअर्सतर्फे संशोधन निधीसाठी अडीच लाख रुपयांचा धनादेश स्टोअर्सच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. पी. डी. राऊत यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी डावीकडून डॉ. डी. के. गायकवाड, अजित चौगुले, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठातील संशोधनासाठी 'कंझ्युमर्स स्टोअर्स'कडून मदतीचा हात

## अडीच लाखांचा दिला निधी : कुलगुरुंकडे धनादेश सुपूर्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कंझ्युमर्स स्टोअर्सने संशोधन निधीसाठी अडीच लाख रुपयांच्या निधीचा धनादेश कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे गुरुवारी (दि. १) सुपूर्द केला.

विद्यापीठात सन १९६७ पासून येथील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या सुविधेसाठी 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर शिवाजी युनिव्हर्सिटी सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स कार्यरत आहे. संस्थेने यंदा सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. स्टोअर्सचा एकूण व्यवहार आता पाच कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांमध्ये त्याचे कार्यक्षेत्र पसरले आहे. विद्यापीठात शिक्षण व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत व्हावी, या उद्देशाने संस्था दरवर्षी आपल्या नफ्यातील काही वाटा विद्यापीठाच्या संशोधन निधीसाठी देत असते. यंदाही संस्थेने अडीच लाख रुपये विद्यापीठास प्रदान करून येथे चालणाऱ्या संशोधन कार्याला मदतीचा हात दिला आहे. कंझ्युमर स्टोअर्सच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. पी. डी. राऊत यांच्या हस्ते व उपाध्यक्ष डॉ. पी. एम. गुरव यांच्यासह संचालक मंडळाच्या उपस्थितीत हा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. व्ही. एन. शिंदे, संस्थेचे सरव्यवस्थापक अवधूत पाटील, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. एस. पाटील, श्री. काळे, आदी उपस्थित होते.